# पॅरिस



पॅरिस.. जगातील सर्वात सुंदर शहरांपैकी एक शहर.पॅरिसला 'सिटी ऑफ लव्ह ' सिटी ऑफ लाइट्स ' 'रोमँटिक सिटी' अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखलं जातं. पॅरिसमधून वळणं आणि वळसे घेत जाणारी सेन नदी, त्यावर बांधलेले कलात्मक पूल, आयफेल टॉवर, तरुणाईची लगबग आणि आजूबाजूला वसलेलं नितांत सुंदर पॅरिस शहर, क्षणोक्षणी मनाला भुरळ घालतं. पॅरिसच्या रस्त्यांवरून मारलेला एक साधा फेरफटकासुद्धा तुम्हाला, इतिहास, कला, सौंदर्य आणि आयुश्या विषयी खूप काही शिकवून जातो.

१०५ स्क्वेअर किलोमीटर एवढा एरिया आणि 22 लाख लोकसंख्या असलेलं पॅरिस हे फ्रान्समधील सर्वाधिक गर्दीचं शहर आहे. सोळाव्या शतकापासून, युरोपमधील आर्थिक,औद्योगिक, सामाजिक घडामोडी, त्याचप्रमाणे शास्त्र ,कला आणि फॅशनचं पॅरिस हे एक महत्वाच केंद्रच झालं आहे. अतिशय सुरेख टाऊन प्लॅनिंग, हे या शहराच, खास वैशिष्ट्य. पॅरिसमध्ये रस्त्यांच्या दुतर्फा चेस्टनटची पुष्कळ झाडे एकमेकांपासून ठराविक अंतरावर लावलेली

आहेत. बहुतांश रस्ते, हे कॉबलस्टोनमध्ये बांधलेले आहेत. या रस्त्यांच्या खाली पॅरिसची अंडरग्राउंड रेल्वे म्हणजेच मेट्रोपॉलिटन धावते. पॅरिसमधील बहुतेक इमारती या लाईमस्टोनमध्ये बांधल्या गेल्या आहेत. एकंदर सहा हजाराच्यावर स्ट्रीट्स, बुलेवार्डस आणि अवेन्यूजची रचना इतकी वैशिष्ट्यपूर्ण केलेली आहे, की पॅरिस चटकन कुठूनही, सारखं आणि सुंदर दिसतं.

सुमारे दोन हजार वर्षापूर्वी केल्टिक वंशाच्या पॅरिसी जमातीने इथे प्रथम वसाहत केली. सेन नदीवर वसलेल्या या गावाला तेव्हापासून या जमातीच्या नावावरून 'पॅरिस' अस नाव पडलं. पुढे रोमन काळात, त्याला ल्युटेशिआ अस म्हटल जाऊ लागल. फ्रेंच लोक मात्र त्याला, आपल्या खास फ्रेंच मध्ये 'पारी' असंच म्हणतात. वर्षानुवर्ष अनेक वेगवेगळ्या कारणांसाठी पॅरिस हे सदैव चर्चेत राहिलेलं शहर आहे.

फ्रान्सची राजधानी असणारं पॅरिस जगातल्या फॅशन कॅपिटल्सपैकी एक आहे. फॅशन ही पॅरिसमधल्या फ्रेंच लोकांची एक मानसिक गरज आहे. उंची परफ्युम्स, मेकअपची साधने, उत्तम कपडे यामध्ये रूची असणाऱ्या शौकीन फ्रेंच माणसांचा 'पॅरिस फॅशन वीक' हा जगात अतिशय लोकप्रिय आहे. त्यातूनच, ही फ्रेंच माणसे, अतिशय विलासी, मौजमजा करणारी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्याला पॅरिसची अतिशय सुखद आणि रोमॅंटिक हवा पुष्कळदा कारणीभूत असते. पॅरिसमधली बहुतेक माणसं, फक्त आजचाच विचार करून जगताना दिसतात, उद्याची काळजी करताना, सहसा कोणी दिसत नाही. त्यामुळे सकाळी लगबग करून पैसे मिळवणारं पॅरिस आणि रात्री मौजमजेमध्ये पैसे उधळणारं पॅरिस यातला फरक आपल्याला लगेच दिसून येतो.

पॅरिसमधील ऐतिहासिक वास्तूंचा विचार केला, तर सबंध पॅरिस शहर हेच एक ओपन एअर म्युझियम आहे असं म्हटलं जातं. आयफेल टॉवर, सेन रिव्हर, कॉंकॉर्ड स्क्वेअर, लुव्र (म्युझियम), आर्क द ट्रायंफ इत्यादी ऐतिहासिक वास्तूंमध्ये, जगभरातल्या पर्यटकांची, प्रचंड गर्दी उसळलेली असते. आयफेल टॉवर आणि लिडो हे त्यातल्या त्यात, विशेष लोकप्रिय... त्याबद्दल पुढील भागात.......... क्रमश :